# बनावट ट्रस्टच्या नावाखाली कोट्यवधींचा घोटाळा; गुलजार-ए-रजा ट्रस्टविरोधात गुन्हा दाखल

■ चार जण ए.टी.एस. औरंगाबादच्या ताब्यात

■ ५ बँकेत मिळून ४ कोटी ७३ लाख ६७ हजार ५०३ रुपये जमा केले




## तक्रार येताच पोलिस अधिक्षकांनी आरोपींना दाखविल्या खाक्या



काल एटीएसच्या पथक ने माजलगावमध्ये येवून ही कारवाई केली आहे. विशेष म्हणजे याप्रकरणात तक्रार येताच पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनीही आपली यंत्रणा सर्तक केली, त्यानंतर त्यांनी माजलगाव ग्रामीण ठाण्याचे पोलिस निरीक्षक बालक कोळी यांच्या माध्यमातून दोघांना ताब्यात घेवून त्यांना खाक्या दाखविल्या आहेत. दरम्यान याप्रकरणाचा तपास माजलगाव ग्रामीण पोलिस बारकाईने करत आहे, त्यामुळे आणखी या प्रकरणातून काय काय बाहेर येते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे बारीक लक्ष असणार आहे.

**४ जण गुन्ह्यात अडकले, दोघांना माजलगाव पोलिसांनी उचलले, | धारूर, केजमध्ये छापेमारी | ५ बँकेत मिळून आले ४ कोटी ७३ लाख ६७ हजार ५०३ रुपये**

माजलगाव। दिव्य वार्ता ।

**धार्मिक कार्याच्या नावाखाली जनतेकडून कोट्यवधी रुपयांचा निधी गोळा करून बँक, आयकर विभाग व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुलजार–ए–रजा या बनावट ट्रस्टविरोधात दहशतवाद विरोधी पथक (एटीएस), औरंगाबाद युनिटच्या तक्रारीवरून गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात ट्रस्टच्या चार विश्वस्तांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमान्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.**

राष्ट्रीय सुरक्षेच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील विविध ट्रस्ट व एनजीओंची माहिती संकलित करत असताना गुलजार–ए–रजा हा ट्रस्ट संशयाच्या भोवऱ्यात आला. या ट्रस्टची स्वतंत्र वेबसाईट तसेच माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील पत्ता आढळून आला. वेबसाईटवर ॲक्सीस बँकेचे खाते क्रमांक देऊन जनतेकडून डोनेशन स्वीकारले जात असल्याचे निदर्शनास आले. ॲक्सीस बँक, मार्केट यार्ड शाखा, लातूर येथे चौकशी केली असता गुलजार–ए–रजा ट्रस्टच्या नावाने एकाच कस्टमर आयडीवर एकूण पाच बँक खाती उघडण्यात आल्याचे निष्पन्न झाले. या खात्यांमधून जनतेकडून प्राप्त होणारा निधी थेट जमा होत असल्याची खातरजमा तपास अधिकाऱ्यांनी स्वतः व्यवहार करून केली.

बँकेतील केवायसी कागदपत्रांची पडताळणी केली असता ट्रस्टच्या नोंदणी क्रमांकात गंभीर तफावत आढळून आली. ट्रस्टने वापरलेला नोंदणी क्रमांक हा प्रत्यक्षात अन्य संस्थेचा असल्याचे स्पष्ट झाले. तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे चौकशी केली असता गुलजार–ए–रजा ट्रस्ट महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत नसल्याचे लेखी स्वरूपात कळविण्यात आले. याशिवाय ट्रस्टने दर्पण पोर्टल, आयकर विभाग व बँकेत वेगवेगळे आणि बनावट नोंदणी क्रमांक वापरून कागदपत्रे सादर केल्याचे तपासात उघड झाले. बनावट कागदपत्रांच्या आधारे पॅनकार्ड काढून आयकर विभागाची फसवणूक केल्याचाही प्रकार समोर आला आहे. तपासात असेही निष्पन्न झाले की, करचुकवेगिरीच्या उद्देशाने खोटे बँक विवरणपत्र आयकर विभागाकडे सादर करण्यात आले.

या बनावट ट्रस्टच्या नावाने ॲक्सीस बँकेतील पाच खात्यांमध्ये एकूण ४ कोटी ७३ लाख ६७ हजार ५०३ रुपये जमा झाल्याचे समोर आले असून हा संपूर्ण निधी धार्मिक कार्याच्या नावाखाली जनतेकडून गोळा करून स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी गुलजार–ए–रजा ट्रस्टचे अध्यक्ष इम्रान शेख कलीम शेख, उपाध्यक्ष सय्यद मुजम्मिल सय्यद नूर, सचिव अहमदुद्दीन कैसर काझी व विश्वस्त तौफिक जावेद काझी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (डीएनएस) २०२३ चे कलम ३१८(४), ३३५, ३३६(२), ३४० अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असून आणखी धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### आरोपींचे मुंबई कनेक्शनही उघड

काल एटीएसने माजलगाव ग्रामीण ठाण्यात गुलजार–ए–रजा या बनावट ट्रस्टच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपींचे मुंबई कनेक्शनही आता उघड झाले आहे. कारण या बनावट ट्रस्टचा एक ट्रस्टी तौफिक जावेद काझी हा मुंबईचा रहिवासी असल्याचे सध्या समोर येत आहे.

### यांच्यावर दाखल झाला गुन्हा

या प्रकरणी गुलजार–ए–रजा ट्रस्टचे अध्यक्ष इम्रान शेख कलीम शेख (रा. अंबाजोगाई), उपाध्यक्ष सय्यद मुजम्मिल सय्यद नूर (रा. पात्रूड ता. माजलगाव), सचिव अहमद्दीन कैंसर काझी (रा. केज) व विश्वस्त तौफिक जावेद काझी (रा. मुंबई) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३३५, ३३६(२), ३४० अन्वये माजलगाव ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तसेच या पैकी सय्यद मुजम्मिल सय्यद नुर आणि अहमदुद्दीन कैसर काझी या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### घोटाळ्यातील आरोपी तीन तालुक्यातील

या घोटाळ्या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झालेला आहे. यापैकी तीन आरोपी हे बीड जिल्ह्यातील आहेत. पात्रूड (ता. माजलगाव) सह केज आणि अंबाजोगाईतील प्रत्येकी एका आरोपीचा यामध्ये समावेश आहे.

### यांच्यावर दाखल झाला गुन्हा

या प्रकरणी गुलजार–ए–रजा ट्रस्टचे अध्यक्ष इम्रान शेख कलीम शेख (रा. अंबाजोगाई), उपाध्यक्ष सय्यद मुजम्मिल सय्यद नूर (रा. पात्रूड ता. माजलगाव), सचिव अहमद्दीन कैंसर काझी (रा. केज) व विश्वस्त तौफिक जावेद काझी (रा. मुंबई) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३३५, ३३६(२), ३४० अन्वये माजलगाव ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तसेच या पैकी सय्यद मुजम्मिल सय्यद नुर आणि अहमदुद्दीन कैसर काझी या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### घोटाळ्यातील आरोपी तीन तालुक्यातील

या घोटाळ्या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झालेला आहे. यापैकी तीन आरोपी हे बीड जिल्ह्यातील आहेत. पात्रूड (ता. माजलगाव) सह केज आणि अंबाजोगाईतील प्रत्येकी एका आरोपीचा यामध्ये समावेश आहे.



# फातेमा तू पेटवली घरोघरी शिक्षणाची पणती, तरीही अंधारात महापुरुषांत नाही तुझी गणती!



भारताच्या सामाजिक व शैक्षणिक इतिहासात एक तेजस्वी, परंतु दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेलं नाव म्हणजे फातिमा शेख. ९ जानेवारी १८३१ रोजी जन्मलेल्या फातिमा शेख या भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका होत्या. त्यांनी सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षण व वंचित घटकांच्या शिक्षणासाठी आयुष्य वाहून घेतले. १८ व्या–१९ व्या शतकातील समाजव्यवस्था अत्यंत अन्यायकारक होती. स्त्री शिक्षणाला पाप समजले जात होते. दलित, मुस्लिम आणि गरीब घटकांसाठी तर शिक्षणाची दारे पूर्णतः बंद होती. अशा परिस्थितीत फातिमा शेख यांनी समाजाच्या विरोधाची पर्वा न करता शिक्षणाचा वसा स्वीकारला. १८४८ साली पुण्यात सुरू झालेल्या पहिल्या मुलींच्या शाळेत त्या शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. त्या केवळ शिक्षण देणाऱ्या नव्हत्या, तर मुलींमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि विचार करण्याची ताकद निर्माण करणाऱ्या होत्या. मुस्लिम समाजातील असतानाही त्यांनी हिंदू, दलित, गरीब, अनाथ अशा सर्वच मुलींना समानतेने शिक्षण दिले.

त्या काळात सावित्रीबाई व फुले दांपत्याला घराबाहेर काढण्यात आलं, तेव्हा फातिमा शेख यांनी त्यांना आपल्या घरी आसरा दिला. हे केवळ सामाजिक सहकार्य नव्हते, तर धर्म, जात आणि समाजाच्या भिंती तोडणारे ऐतिहासिक पाऊल होते. त्यांच्या घरातूनच अनेक शाळांचा पाया घातला गेला. समाजातील प्रतिगामी शक्तींनी त्यांच्यावर दगडफेक, शिवीगाळ, धमक्या देण्याचे प्रकार केले. पण त्यांनी कधीही शिक्षणाचा मार्ग सोडला नाही. त्यांच्यासाठी शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हते, तर गुलामगिरीतून मुक्ती मिळवण्याचं साधन होतं.

आजही स्त्री शिक्षण, दलित–मुस्लिम समाजाचा शैक्षणिक विकास आणि समतेचा लढा यांचा विचार करताना फातिमा शेख यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या कार्यामुळे हजारो वंचित मुलींच्या आयुष्यात उजेड निर्माण झाला. दुर्दैवाने त्यांच्या मृत्यू दिनांकाची अधिकृत नोंद उपलब्ध नाही, तरीही त्यांच्या कार्याचा वारसा आजही जिवंत आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता, शिक्षण हीच खरी क्रांती आहे हा संदेश आपल्या कृतीत उतरवण्याचा संकल्प करायला हवा. फातिमा शेख यांची जयंती म्हणजे स्त्री स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि मानवतेच्या विजयाचा उत्सव आहे.

ज्या स्त्रीने भारताच्या पहिल्या मुलींच्या शाळेत सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून उभी राहत शिक्षणाची बीजे पेरली, ज्या स्त्रीने समाजाच्या शिव्या, धमक्या, दगड,चिखल सहन करत मुलींनी  शिकायलाच पाहिजे हा दीप अखंड पेटता ठेवला, त्या फातेमा शेखआजही आपल्या इतिहासात दुय्यम ठरवल्या जातात.

पुस्तकांमध्ये नाव कमी,महापुरुषांच्या यादीत तिचं अस्तित्वही नाही,पण ज्या प्रत्येक शिकलेल्या मुलीच्या हातात पुस्तक आहे,त्या प्रत्येक पुस्तकात फातेमा शेख यांचा श्वास आहे. त्या केवळ एक शिक्षिका नव्हत्या,त्या एक क्रांती होत्या .त्या केवळ इतिहास नव्हत्या,त्या आज ही एक जिवंत प्रश्न आहे,आपल्या समाजाला विचारणारा आजही त्यांच्या नाव महापुरुषांच्या पानावर नाही, पण त्यांच्या काम,प्रत्येक शिकलेल्या पिढीत जिवंत आहे,आणि तेच त्यांचं खरं स्मारक आहे. या थोर समाजसुधारक शिक्षिकेस जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.



लेखन : शेख मुदस्सिर / परळी





बीड : बीड नगरपरिषदेच्या सदस्य(नगरसेवक) पदी विजयी निवड झाल्या बद्दल अनेक नगरसेवकांना बाबरी मुंडे यांच्या हस्ते शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सर्व नगरसेवक बाळासाहेबजी गुंजाळ, रंजित बनसोडे, शुभम धूत, राकेश जाधव, भारत कांबळे, नंदकिशोर पिंगळे, रइस शेख, रोहिल शेख, दत्ता जाधव, सुरज चुंगडे, सनी माने पाटील यांच्यासह आदि.

# मिल्लिया महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

बीड, (दिव्य न्युज) : येथील मिल्लिया कला विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अंजुमन इशात–ए –तालीम संस्थेचे संस्थापक सचिव स्वर्गीय अहमदबीन अबुद चाऊस यांच्या १५व्या स्मृतीदिना निमित दिनांक ०९ जानेवारी २०२६ शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलयास फाजील  यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी  उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. फैसल चाउस एस.एस. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर रमेश वारे, प्रा. शोएब पीरजादे, प्राध्यापिका डॉ. शामल जाधव, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर आयुब पठाण, ग्रंथपाल डॉ.आमेर सलीम, करियर कट्टाचे समन्वयक डॉ. मोहम्मद आसेफ इक्बाल यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोफेसर रमेश वारे यांनी केले. त्यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगितले तसेच घेणारे न होता देणारे व्हावे व रक्तदान हे एक सामाजिक कार्य आहे असे सांगितले. डॉ.आगाखान पठाण, मिल्लिया कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फैसल चाउस, प्रोफेसर आयुब पठाण, डॉ.शेख गफुर, कार्यालयीन अधीक्षक शेख मोहम्मद रिझवान, प्राध्यापक, कर्मचारी वृंद तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यानी रक्तदान केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा रूग्णालय बीड येथील डॉक्टर गणेश जोशी, टेक्निशियन श्री. सचिन सतकर, श्री.प्रकाश लोकडे, श्री. अमोल हावळे,राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# परभणी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर  पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन

## १५० फरार आरोपी गजाआड; ४ अवैध शस्त्रधारक व्यक्ती ताब्यात

परभणी, (दिव्य न्युज) :  परभणी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२६ च्या पार्श्वभूमीवर परभणी पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परभणी शहर आणि जिल्ह्यात गुरुवारी(दि. ८) रात्री एकाच वेळी कोम्बिंग ऑपरेशन राबविले. या कोम्बिंग कारवाईत जिल्ह्यातील १५० फरार आरोपींना गजाआड करण्यात आले. तर चार अवैध शस्त्रधारक आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान अग्निशस्त्र आणि घातक शस्त्रांचा वापर करणाऱ्या गुन्हेगारांच्या घरांची झाडाझडती घेण्यात आली. गुन्हेगारी टोळ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून त्यांच्या हालचालींवर आळा घालण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली. यामध्ये वॉरंट आणि गुन्ह्यांमध्ये फरारी असलेल्या १५० आरोपींना अटक करण्यात आली. तसेच अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपींच्या घरझडतीतून शेख जावेद शेख साहेबलाल रा. धाररोड परभणी याच्याकडून एक तलवार, सोनूसिंग पूनमसिंग टाक (वय २६)रा. अण्णाभाऊ साठेनगर परभणी याच्याकडून दोन तलवारी, लक्ष्मण किशन माने(वय १९) रा. हटकरगल्ली ताडकळस याच्याकडून एक तलवार अशा एकूण चार तलवारी आणि एक खंजीर जप्त करण्यात आला असून या चारही आरोपींविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियमाच्या विविध कलमान्वये संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.  याशिवाय गुन्हे करण्याच्या उद्देशाने ओळख लपवून संशयास्पदरित्या फिरणाऱ्या चार आरोपींवर महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हे विशेष कोम्बिंग ऑपरेशन पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात आणि अपर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात दोन उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी, २५ अधिकारी – अंमलदार, १९ पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, त्यांचे



दुय्यम अधिकारी आणी तब्बल १९० पोलिस अंमलदारांच्या सहभागातून हे राबविण्यात आले.  महानगरपालिका निवडणुकांच्या कालावधित कोणत्याही समाजकंटकाला कायदा हातात घेण्याची संधी दिली जाणार नाही. गुन्हेगारांविरुद्ध अशीच कडक, सातत्यपूर्ण आणि निर्णायक कारवाई यापुढेही सुरू राहील असे परभणी पोलीस अधीक्षक रवींद्र सिंह परदेसी यांनी सांगितले आहे.

# धनुभाऊंच्या परळीत 'खान अन् बाण' एकत्र

# राष्ट्रवादी, शिवसेना, एमआयएमची ऐतिहासिक युती

परळी । दिव्य वार्ता ।

**भाजपने अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये काँग्रेससोबत आणि अकोट नगरपरिषदेमध्ये एमआयएमसोबत केलेली आघाडी राज्यभरात टीकेचा विषय ठरली. मोठ्या प्रमाणात टीका झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने या दोन्ही आघाड्या तोडण्यात आल्या. यानंतर अवघ्या २४ तासांत परळीमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येत आघाडी स्थापन केली आहे. यात एमआयएमलाही सोबत घेण्यात आले आहे. परळीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने गटनेता निवडीत युती केली आहे. यात नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाच्या गटात मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आक्षेपार्ह आरोप करत निवडून आलेल्या एमआयएमच्या (चखच्) सदस्या आयेशा मोसीन शेख यांनाही सोबत घेण्यात आले आहे. या युतीची राजकीय वर्तुळात नव्यानं चर्चा होऊ लागली आहे.**

परळीतील या नव्या राजकीय समीकरणावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी टोला लगावला आहे. दानवेंनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना चिमटा घेतला आहे. सोशल मीडियावर दानवे यांनी शिंदेंना डिवचलं आहे. ज्यांच्यावर टीका करून सत्तेची पायरी चढलात, आज त्याच्याशीच जमलं तुमचं! हीच का तुमची खरी वैचारिक भूमिका? परळीतल्या या नव्या 'सत्तेच्या संसाराचा' चेहरा महाराष्ट्राने पाहिला आहे. ही नवी युती मुबारक, असा खोचक टोला दानवेनी शिंदेंना लगावला. एकनाथ शिंदे जी, परळी नगरपालिकेत शिंदे गट-एमआयएम-राष्ट्रवादीची जी युती झाली आहे, ती पाहून आता तुमच्या 'बंड' आणि 'तत्त्वांच्या' गप्पा कायमच्या थांबवा. राष्ट्रवादी नको नको म्हणता म्हणता, आता तुम्ही थेट 'एमआयएम-वासी' झालात? असा सवाल दानवेंनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या युतीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोण एमआयएम? ओळखत नाही, असे म्हणत प्रतिक्रिया दिली आहे.

परळी नगरपरिषद निवड जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गटनेत्याची निवड करण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाच्या गटनेतेपदी नगरसेवक तथा राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके यांची निवड झाली. या गटात नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस -१६ , भाजप -७, अपक्ष - ४, शिवसेना - २, एमआयएम - १, अशा २४ जणांचा समावेश आहे.

भाजपचे ७ आणि अपक्ष २ अशा ९ नगरसेवकांनी स्वतंत्र गट स्थापन केला असून पवन मुंडे यांची गटनेतेपदी सर्वानुमते निवड केली आहे. भाजप एमआयएमसोबत कोणत्याही प्रकारच्या आघाडीमध्ये नसल्याचे दाखवून देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

### विरोधकांनी शिंदे गटाला घेरलं...

एमआयएमसोबत युती केल्याने देशभरात भाजपच्या निर्णयावर चर्चा सुरू असताना दुसरीकडे शिंदे गटानेही केलेल्या युतीची चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांनी शिंदे गटाला घेरताना आता कुठं हिंदुत्व असा सवाल केला आहे. शिवसेना शिंदे गटाने एमआयएमसोबत केलेली युती ही राज्यात चर्चेची विषय ठरली आहे.

### एकनाथ शिंदे यांनी काय म्हटले?

पुण्यात शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभा घेतली. या सभेनंतर शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. परळीतील राजकीय घडामोडीवर विचारले असता त्यांनी एका वाक्यात उत्तर दिले. शिंदे यांनी कोण एमआयएम असा उलट सवाल करत अधिक भाष्य करणे टाळले.

### परळीत काय घडलं?

परळी नगरपरिषद निवड जिल्हाधिकारी बीड यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व मित्र पक्षाच्या गटनेतेपदी नगरसेवक आणि राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके यांची निवड करण्यात आली. नव्याने स्थापन झालेल्या गटात नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट - १६ , शिवसेना शिंदे गट - २,एमआय एम - १,अपक्ष - ४ अशा २४ जणांचा समावेश आहे. या मित्र पक्षांमध्ये एमआयएमच्या नगरसेविका शेख आयशा मोहसीन यांचा समावेश असून उर्वरित सदस्यांमध्ये अपक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, आणि शिंदे सेना यांच्या नगरसेवकांचा समावेश आहे.

## मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात

**सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण - सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने -डॉ.ढवळे**




बीड। दिव्य वार्ता ।

मराठवाड्यात २०२५ या वर्षात एकूण ११२९ शेतकरी आत्महत्या झाल्या असून, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत मरणाला कवटाळले आहे. मागील दोन वर्षांपासून बीड जिल्हा मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये आघाडीवर असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.शासन व प्रशासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण ▶▶ पान २ वर

## शिवजन्मोत्सवानिमित्त सर्वधार्मिय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**गरजूंनी नाव नोंदणी करण्याचे आयोजक बाळू ताकट यांचे आवाहन**



माजलगाव। दिव्य वार्ता ।

आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबांना दिलासा मिळावा. समाजात ऐक्याची भावना वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने प्रति वर्षाप्रमाणे शिवजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंदाही शिवसेवाभावी शिवजन्मोत्सव समितीकडून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.यंदाच्या सोहळ्यासाठी नाव नोंदणी सुरू असून, इच्छुक पात्र वधूवरांनी वेळेत नोंदणी करून या सामाजिक उपक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजक बाळू ताकट यांनी केले आहे. शिव सेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त सर्व जाती धर्माच्या गोरगरीब पात्र मुलामुलींच्या विवाह सोहळ्याचे आयोजन गेल्या अनेक वर्षापासून ▶▶ पान २ वर

## नगरसेवक जैतुल्ला खान यांना बीड नगरपालिकेचा उपाध्यक्ष पद द्यावेत-पठाण नझीर खान लाला

बीड। दिव्य वार्ता ।



नगरसेवक जैतूल्ला खान हे मागील पंचवीस वर्षांपासून समाज सेवक म्हणून बीड शहरातील व जिल्ह्यातील सर्व समाजातील गोर गरीब लोकांचे रात्र दिवस काम करतात..जैतूल्ला खान मागील पंधरा वर्षांपासून नगरपालिकेत निवडून येत आहेत. जैतूल्ला खान यांचे काम तहसील कार्यालय..दवाखान्यात. पोलीस स्टेशन व रात्र दिवस लोकांचे सुखात कमी दुखात जास्त वेळ देत असल्या मुळे लोकांनी त्यांना गरीबांचा लोकप्रिय आहेत म्हणून भरपूर मताधिक्यनी निवडून दिले.

जैतूल्ला खान हे पठाण समाजातील असल्याने त्यांना बीड नगरपालिकेत उपाध्यक्ष पद दिल्याने बीड शहरातील पठाण समाज बहुसंख्याक असल्या मुळे पठाण समाजाला न्याय भेटतील..पठाण समाजातील नेते रूस्तम खान पठाण हे बीड नगरपालिकेत उपाध्यक्ष होते..रूस्तम खान काका हे शरदचंद्र पवार साहेबांचे विश्वासू कार्यकर्त्ये होते. त्या मुळेच बीड शहरातील ▶▶ पान २ वर

## दीक्षा फाउंडेशनचा मायेचा आधार

**बंजारा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या जाधव यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली- कुटुंबाला आर्थिक मदत**



बीड। दिव्य वार्ता ।

बंजारा समाजाला एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी व्हिडिओद्वारे आपली व्यथा मांडून गेवराई तालुक्यातील केकत पांगरी येथील प्रवीण बाबुराव जाधव यांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे. मयत प्रवीण जाधव यांच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी दीक्षा फाउंडेशनच्या अध्यक्षा दीक्षा दिलीप जाधव यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून स्वीकारली आहे. दीक्षा फाउंडेशनच्या वतीने जाधव कुटुंबाची भेट घेऊन त्यांना आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी दीक्षा फाउंडेशनच्या अध्यक्षा दीक्षा ▶▶ पान २ वर

## छत्रपती शिवाजी महाराज जातीयवादी नसून मानवतावादी -प्रा.शेख सुभान अली





जिंतूर । दिव्य वार्ता ।

छत्रपती शिवाजी महाराज हे जातीयवादी नसून मानवतावादी, लोककल्याणकारी आणि धर्मनिरपेक्ष राज्यकर्ते होते. स्वराज्याचा शत्रू तो कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असो, त्याला शिक्षा ▶▶ पान २ वर

## राजमाता जिजाऊ यांच्या पुतळा परिसराची डॉ.सारिकाताई क्षीरसागरांनी केली पाहणी



बीड। दिव्य वार्ता ।

राजमाता जिजाऊ यांची जयंती येत्या १२ तारखेला उत्साहात साजरी होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील राजमाता जिजाऊ यांच्या पुतळा परिसराची भाजपच्या गटनेत्या तथा नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.८) पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी पुतळा ▶▶ पान २ वर

## दुःखावर फुंकर घालणारी पत्रकारांची माणुसकी




**डोंगरे कुटुंबासाठी मदत फेरीतून उभारला एक लाखांचा भक्कम आधार**

वडवणी, (दिव्य न्युज) : डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजुर गणेश डोंगरे यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने एका कष्टकरी कुटुंबाचा कणा मोडला. कुटुंबाचा ▶▶ पान २ वर

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात कालिकादेवी विद्यालय सर्वप्रथम

शिरूर । दिव्य वार्ता ।

महाराष्ट्र राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर,आणि जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग बीडच्या वतीने छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज,अंबाजोगाई येथे आयोजित '५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन' दि.०६ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न झाले.विकसित व आत्मनिर्भर भारतासाठी (डढएच्) या मुख्य विषयावरील जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्याच्या सर्व तालुक्यातील विजेते बालवैज्ञानिक व शिक्षक यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पक प्रतिकृती प्रदर्शित केल्या होत्या.यामध्ये शिरूर (का.)जि.बीड येथील कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यालयाने ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवला होता.माध्यमिक गटातून विद्यालयाचा विद्यार्थी चिं.शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने, बहुउद्देशीय सौर रस्ता क्लीनर म्हणजेच सौर उर्जेवर चालणारे एक आधुनिक उपकरण बनवून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सादर केले होते.या वैविध्यपूर्ण व बहुउद्देशीय यंत्राचे तसेच या नव्या संकल्पनेचे परीक्षकांनी कौतुक केले.अशा ▶▶ पान २ वर




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०